**हंगाम २०१६-१७ मधील सोयाबीन अनुदान योजनेचा लाभ खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारकांना सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

**शासन निर्णय क्रमांक:- पूरक- २०२१/प्र.क.११४ /२४ स**

मंत्रालय, मुंबई- ३२

दिनांक : -०५ डिसेंबर, २०२२

**संदर्भ:**- १) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. ५ /२४ स, दिनांक १० जानेवारी, २०१७

२) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. ५ /२४ स, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७

३) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०१८/प्र.क्र. ३०९/२४ स, दिनांक ८ मार्च, २०१९

४) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: पूरक-२०१९/प्र.क्र. ८१/२४ स, दिनांक ६ ऑगस्ट, २०१९

५) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०२२/प्र.क्र. ४७/२४ स, दिनांक २१ एप्रिल, २०२२

६) शासन परिपत्रक वित्त विभाग,
क्रमांक पूरक-२०२२/प्र.क्र.६६/ अर्थसंकल्प-३, दिनांक २९ ऑगस्ट,२०२२

७) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
क्रमांक :- पुरक-१९२२/प्र.क्र.२६/२०२२/१७ स, दिनांक ३० ऑगस्ट, २०२२

**प्रस्तावना:-**

खरीप हंगाम २०१६-२०१७ मध्ये राज्यात सोयाबीनच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे सोयाबीनच्या दरात झालेल्या घसरणीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी शासन निर्णय, दिनांक १०/१/२०१७ अन्वये माहे ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर,२०१६ या कालावधीत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/- व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर केले होते. सदर अनुदानाचा लाभ महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) १९६३ मधील नियम ४ ब मधील तरतूदीनुसार परवानाप्राप्त खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारकांना सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना देण्यासाठी शासन निर्णय,दिनांक ८/८/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक ८/३/२०१९ अन्वये अन्य ४ खाजगी बाजार समित्यांचा सोयाबीन अनुदान योजनेत समावेश करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याअंतर्गत

१५ खाजगी बाजार संस्था व १६ थेट पणन परवानाधारकांना सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्याना सोयाबीन अनुदानाचा लाभ मिळणार आहे.

सदर योजनेंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी सुरुवातीस **रुपये १०८.६४ कोटी** इतका निधी आकस्मिकता निधीमधून आणि ३ खाजगी बाजार समित्या व ५ थेट पणन परवानाधारकांना **रुपये ३.९६१२ कोटी** पुरवणी मागणीद्वारे आणि ४ खाजगी बाजार समित्या व ३ थेट पणन परवानाधारकांना **रुपये ५२,२७,५७७** पणन संचालनालयाकडे शिल्लक रकमेतून असा एकूण **रुपये ११३.१२४० कोटी** इतका उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सोयाबीन अनुदान या योजनेची नियमितपणे अंमलबजावणी केली जात नसल्याने, सदर योजनेसाठी नाममात्र अर्थसंकल्पिय तरतूद केली जाते. सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान योजनेसाठी रुपये १००० नाममात्र अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. या योजनेंतर्गत प्रस्ताव प्राप्त झालेल्या २ खाजगी बाजार समित्या व २ थेट पणन परवानाधारकांना प्रलंबित **रुपये १,६१,५१,७८२** इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी **रुपये १,६१,५१,७८२** इतकी रक्कम सन २०२२ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आली आहे.सदर पुरवणी मागणीद्वारे मंजूर निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

"**राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य**" या योजनेंतर्गत रुपये १०० प्रति क्विंटल प्रमाणे मंजूर प्रलंबित सोयाबीन अनुदान थेट पणन परवानाधारक/खाजगी बाजार समित्यांना अदा करण्यास सन २०२२ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेली रक्कम **रुपये १,६१,५१,७८२** सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देत आहे.

२. पुरवणी मागणीद्वारे मंजूर रक्कम खालील थेट पणन परवानाधारक/खाजगी बाजार समित्यांना अदा करण्यात यावी :-

| अ. क्र. | थेट पणन परवानाधारकांचे नांव / खाजगी बाजार संस्थेचे नांव | लाभार्थी संख्या | अनुदानाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र ऑईल एक्सट्रेक्शन प्रा.लि.पुणे शाखा परभणी | ६९२ | २१,०६,१२४ |
| २ | नाना मुंदडा कृषी उत्पन्न खाजगी बाजार , मालेगांव, जि.वाशिम | २०२८ | ५६,५३,९७६ |
| ३ | संत नामदेव कृषी बाजार सोनगांव,जि.हिंगोली | ३४४२ | ७८,०९,७६२ |
| ४ | आयटीसी लि.नागपूर ॲग्री बिझनेस डिव्हीजन, शाखा चौपाल सागर, लि.परभणी | २५२ | ५,८१,९२० |
| | **एकूण** | **६४१४** | **१,६१,५१,७८२** |

३. अनुदानासाठी विहित कालमर्यादा माहे ऑक्टोबर, २०१९ संपुष्टात आली असल्यामुळे यापुढे कोणत्याही खाजगी बाजार समिती/थेट पणन परवानाधारक यांचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, या अटीच्या अधीन राहून सदर अनुदान वितरित करण्यात येत आहे.

४. या योजनेंतर्गत होणारा खर्च नमूद लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पुरक मागणी निधीतून भागविण्यात यावा:-

**मागणी क्रमांक व्ही-२**
**२४२५ सहकार**
**१०८ इतर सहकारी संस्थांना सहाय्य**
**(०१)(०३) राज्यातील सोयाबीन शेतकऱ्यांना अर्थसहाय्य (अनिवार्य) (२४२५ २५३३)**
**३३, अर्थसहाय्य**

४. या योजनेंतर्गत उपलब्ध तरतूदीचे आहरण करुन ती संबंधित थेट पणन परवानाधारक/खाजगी बाजार समित्यांना वितरीत करण्याच्या प्रयोजनार्थ लेखाधिकारी, पणन संचालनालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी व पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २ मध्ये दर्शविण्यात आलेली अनुदानाची रक्कम संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्यामार्फत अदा करण्यात यावी.

६. सदर अनुदान वितरित केल्याचा अहवाल पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी १ महिन्यात शासनास सादर करावा.

७. वित्त विभागाचे अनौपचारीक सं.क्र.५२१/२०२२/व्यय-२, दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ व परिपत्रक, क्रमांक पूरक-२०२२/प्र.क्र.६६/अर्थसंकल्प-३,दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ अन्वये उपरोक्त बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून, दिनांक २.४.२०१८ च्या परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ परिच्छेद या योजनेस लागु नाहीत. तसेच दिनांक १८.४.२०१७ च्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या सर्व संबंधित बाबींची पूर्तता होत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२२१२०५१५०८५४६८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SUNANDA MOHANRAO GHADYALE

Digitally signed by SUNANDA MOHANRAO GHADYALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=fd89208cbc27b202c96467165ac5bc9643515d80ba9edecaf650dad6e8311b45,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C5ADFF2513F33AFA9ED70C79C5A4636204D8BB4040BF2C6C2470D0F20D8DC79D, cn=SUNANDA MOHANRAO GHADYALE
Date: 2022.12.05 15:11:55 +05'30'

**( सुनंदा मो. घड्याळे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

I. मा. मंत्री (सहकार व पणन ) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई

II. मा. राज्यमंत्री ( पणन ) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
III. अपर मुख्य सचिव (सहकार व पणन) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
IV. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
V. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
VI. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे
VII. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
VIII. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी/वाशिम/हिंगोली
IX. महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,
X. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ नागपूर
XI. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
XII. वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-११, मंत्रालय, मुंबई-३२
XIII. निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.